महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

www.dvet.gov.in desk७@dvet.gov.in ०२२६२०६०४/२९३.

**परिपत्रक** पत्र क्रमांक: ०७/प्रवेश/२०२१/१६

दि. १२.०१.२०२१

**विषय:** जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीनंतर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरणेबाबत.

१. राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ऑगस्ट २०२० सत्राची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने दि.०१.०८.२०२० पासून सुरू करण्यात आली आहे.

२. ऑगस्ट २०१९ सत्र व तत्पूर्वी राबविण्यात येणाऱ्या केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत संस्थास्तरीय समुपदेशन फेरी केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी राबवण्यात येत होती. जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीनंतर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील रिक्त राहिलेल्या जागा या संबंधित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना संस्थास्तरावर म्हणजेच व्यवस्थापन कोटयातून भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत होत्या.

३. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संस्थास्तरीय व्यवस्थापन कोट्यातील जागांवर झालेल्या प्रवेशास प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळू शकत नाही. सबब, दि. १३.०१.२०२१ पासून राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संस्थास्तरीय समुपदेशन फेरी आयोजित केलेली आहे. संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये झालेल्या प्रवेशांना नियोजित प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळू शकतो.

४. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असोसिएशन यांनी जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत अनौपचारीकरित्या संचालनालयास विनंती केली आहे.

५. तरी या परिपत्रकाद्वारे सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सुचित करण्यात येते की, ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना जिल्हा समुपदेशन फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा या त्यांच्या स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध करून घ्यावयाच्या असतील, त्यांनी आज दि.१२.०१.२०२१ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत सोबत देण्यात आलेल्या नमुन्यात आपले विनंतीपत्र संचालनालयातील कार्यासन क्र.०७ यांना desk७@dvet.gov.in या ई-मेलवर सादर करावे.

६. इच्छुक खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी विहित नमुन्यातील आपले विनंतीपत्र संचालनालयात दिलेल्या मुदतीत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या विनंतीपत्रांचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

(दीपेन्द्र सिंह कुशवाह भा.प्र.से)
संचालक

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीस्त

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालये (ईमेलव्दारे)

२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालये

३. प्राचार्य, खाजगी औ.प्र.संस्था, (प्रा.का.मार्फत)

संस्थेचे लेटरहेड

जा.क्र.

दि.

प्रति,
मा. संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
मुंबई – ४०० ००१

विषय: जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा या संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ: संचालनालयाचे पत्र क्र.०७/प्रवेश/२०२१/१६, दि. १२.०१.२०२१

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीनंतर आमच्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील रिक्त जागा या आमच्या संस्था स्तरावर भरण्यासाठी दि.१३.०१.२०२१ पासून उपलब्ध करून देण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. संस्थेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव: ___________________________________
खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा पत्ता: _________________________________
संस्थेचा NCVT MIS Code: ________________________________________

आपला विश्वासू,
सही
(प्राचार्य नाव)

संस्थेचा शिक्का